## मुंबई मेट्रो 3 प्रकल्पामध्ये 5 किमी चे भुयारीकरण पूर्ण

*15 टनेल बोरिंग मशीन्स मुंबईत दाखल आणि 8 मशीन्स पूर्णतः कार्यान्वित*

**मुंबई, जुलै 10, 2018:** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो 3 प्रकल्पातील 5100 मीटर लांबीच्या भुयारीकरणाचे काम आत्तापर्यंत पूर्ण झाल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन ने आज जाहीर केले. शहरातील पहिल्या संपूर्ण भुयारी मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे करण्यात येत असून विविध ठिकाणच्या टीबीएम लॉन्चिंग शाफ्टद्वारे टनेल बोरिंग मशीन्स भूगर्भात सोडून भुयारीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. मेट्रो 3 प्रकल्पासाठी एकूण 17 टीबीएम्स ची आवश्यकता असून त्या सर्वांची कारखाना स्वीकृती चाचणी यशस्वीपणे पूर्ण झाली आहे. त्यापैकी 15 मशीन्स मुंबईत दाखल झाली असून 8 मशीन्स पूर्णतः कार्यान्वित झाली आहेत. अजून 3 मशीन्स भूगर्भात सोडण्याचे काम सध्या सुरू आहे तर 2 टीबीएम्स जुलै महिन्याअखेरीस जमिनीत सोडण्यात येतील. उर्वरीत टीबीएम्स सप्टेंबर पर्यंत शाफ्ट मध्ये उतरविण्यात येतील.

सर्व 17 टीबीएम्स ऑक्टोबर 2018 अखेर पूर्णतः कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

- आझाद मैदान लाँच शाफ्ट: येथून पॅकेज 2 मधील वैतरणा 1 आणि 2 या टीबीएम्स नि 1050 मीटर चे भुयारीकरण पूर्ण केले आहे. त्यांना ग्रँट रोड पर्यंत 4.5 किमी चे भुयार तयार करायचे आहे.

- नयानगर लाँच शाफ्ट: येथून पॅकेज 4 मधील कृष्णा 1 आणि 2 या टीबीएम्स नि 2164 मीटर चे भुयारीकरण पूर्ण केले आहे. त्यांना दादर मेट्रो स्टेशन पर्यंत 2.5 किमी भुयार तयार करायचे आहे.

- विद्यानगरी लाँच शाफ्ट: येथून पॅकेज 5 मधील गोदावरी 1 आणि 2 या टीबीएम्स नि 1073 मीटर चे भुयारीकरण पूर्ण केले आहे. त्यांना सीएसआयए आंतरदेशीय विमानतळ स्टेशन पर्यंत 2.98 किमी भुयार तयार करायचे आहे.

- मरोळ नाका लाँच शाफ्ट: येथून पॅकेज ७ मधील वैनगंगा 1 आणि 2 या टीबीएम्स नि 896 मीटर चे भुयारीकरण पूर्ण केले आहे. त्यांना सीएसआयए आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशन पर्यंत 1.2 किमी भुयार तयार करायचे आहे.

या संदर्भात बोलताना मुंमेरेकॉ च्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे म्हणाल्या, " भुयारीकरणाचे काम सुरू झाल्यापासून 1 वर्षाच्या आतच 5 किमी लांबीच्या भुयाराचे काम पूर्ण झाल्याचे सांगताना मला विशेष आनंद होत आहे. सर्वांचे सहकार्य आणि भक्कम पाठिंबा यामुळेच हे शक्य झाले आहे." प्रकल्प कामात सातत्याने सहकार्य करणाऱ्या मुंबईकरांचे त्यांनी आभार मानले.

मेट्रो 3 प्रकल्पात अप आणि डाउन असे दोन्ही भुयारी मार्ग विचारात घेता एकूण 52 किमीचे भुयारीकरण अपेक्षित आहे. सध्या 8 टीबीएम्स आठवड्याला 350 मीटर या गतीने भुयारे खणत आहेत. हा वेग ऑक्टोबर 2018 पासून प्रति आठवडा 700 ते 800 मीटर जाण्याची शक्यता आहे. पॅकेज 7 मधील टीबीम सर्वप्रथम भुयार पूर्ण करून सप्टेंबर 2018 मध्ये ब्रेकथ्रू साध्य करणे अपेक्षित आहे.

**For media queries, please contact**
**Vaidehi More**
+91 9028 543087
Vaidehi.more@mmrcl.com

**Sukriti Kumar**
+91 9833 252547
Sukriti.kumar@bm.com